# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

झो. पु. प्रा
निश्चयेन परिवर्तनम्।
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड

**मुख्य कार्यालय** : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. झोपुप्रा/तां-१/भोप्र/मा.क्र.१७७/ ४८५ /२०२२ दि.१९/०४/२०२२.

२८६
१९/०४/२०२२

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र

वाचा :-

१. प्रथम बांधकाम परवानगी जा.क्र. ३०४/२०१९ दि.०२/०२/२०१९
२. सुधारीत बांधकाम परवानगी जा.क्र. ८५४/२०२१ दि.११/०६/२०२१
३. विकसक मे. आनंद डेव्हलपर्स यांचा दि. ०२/१२/२०२१ रोजीचे इमारत C साठी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र मागणी अर्ज.

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ४५ प्रमाणे सि.स.नं. ५६१अ, ५६१ / ब१, ५६१ / ब१ / १अ व ५६२ नाना पेठ, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारत C साठी या कार्यालयाकडून जा. क्र झोपुप्रा/तां.१/८५४/२०२१ दि.११/०६/२०२१ अन्वये बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदर योजनेत प्रत्यक्ष झालेल्या बदलाप्रमाणे (सादर नकाशांप्रमाणे) इमारतीमधील काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील सदनिका/ गाळे इ.साठी भोगवटा पत्र मिळण्याबाबत प्रकल्पाचे विकसक मे. आनंद डेव्हलपर्स यांनी उपरोक्त वाचा क्र.३ मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज सादर केल्यानुसार सदर योजनेसाठीची स्थळपाहणी करण्यात आली असून सदरच्या स्थळपाहणी अंती अंतर्गत बदल आढळून आलेनुसार सादर केलेल्या दुरूस्तीवजा नकाशानुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. १८/०४/२०२२ रोजीच्या टीपणी अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे तपशीलानुसार इमारत C साठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० चे नियमन क्र.२.११ अन्वये अंशत: भोगवटा प्रमाणपत्र खालील प्रमाणे देणेत येत आहे.

विक्री इमारत – C

| अ.क्र. | मजले | सदनिका/दुकान क्र. (विक्री घटक) | एकूण सदनिका/दुकाने |
|---|---|---|---|
| १) | लोअर ग्राउंड फ्लोअर | L१, L२ | २ दुकाने |
| २) | अप्पर ग्राउंड फ्लोअर | U१, U२ | २ दुकाने |
| ३) | पहिला | १०१,१०२,१०३,१०४ | ४ ऑफिस |
| ४) | दुसरा | २०१,२०२,२०३ | ३ ऑफिस |
| ५) | तिसरा | ३०१,३०२,३०३,३०४ | ४ ऑफिस |
| ६) | चौथा | ४०१,४०२,४०३,४०४ | ४ ऑफिस |
| ७) | पाचवा | ५०१,५०२,५०३,५०४ | ४ ऑफिस |
| **एकूण अंशत:** भोगवटा द्यावयाच्या दुकान गाळे – ०४ दुकाने+१९ ऑफिस | | | |

**इमारत C (विक्री इमारत)**

i) विक्री घटक :- ०४ दुकाने+१९ ऑफिस

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

अटी :-

१) प्रस्तुत अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) अंशत: भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले अंशत: भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) इमारतीचे सर्व बाजुने असणारे मंजूर नकाशात दर्शविलेनुसार सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) खुले ठेवणे बंधनकारक आहे.

६) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

७) विषयांकित योजना रस्तारुंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्यास म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, उर्वरित टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

८) प्रस्तुत गृहनिर्माण प्रकल्पाकरीता सक्षम प्राधिकाऱ्याने पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिका हस्तांतरण करणेपुर्वी पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे विकसकास बंधनकारक राहील.

सहायक संचालक नगररचना
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
पुणे

प्रत :- १) विकसक मे. आनंद डेव्हलपर्स
बी-१, साधू वासवानी चौक, पुणे रेल्वे स्टेशन जवळ, पुणे.
२) **तहसिलदार,ताबा विभाग,** झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव अग्रेषित.
३) **संगणक अधिकारी,** झोपुप्रा, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.